(Marathi)

10|9
9|21

1531 - 33 P

Veera Jagdevrao Chandurkar yancha Powada, Bhaga Pahila (Ballad of veera Chandurkar, pt. I. C.P. & Berar.
20.3.40.
1531
1531

॥ वंदेमातरम् ॥

# वीर जगदेवराव

## - चांदुरकर -

यांचा

# पोवाडा

**भाग पाहिला.**

शाहीर-पुंडलीक रावजी पाटील

राहणार भोन

ता. जळगांव जि. बुलडाणा पो. पातुर्डा

**किंमत १॥ आणा.**

आवृत्ति १ ली ] * [ सन १९३९

NATIONAL ARCHIVES LIBRARY
No. 1531
Date 17.1.72
GOVT. OF INDIA

IMPERIAL RECORD
Regr No.
20. mar. 1940
DEPARTMENT

२४०

# [ चौक १ ला, ]

त्याने जगति जन्मा येउनी । धन्य केलि करणी ॥
पोवाडा त्या शूर मर्दाचा । ऐका शांत चित्त साचा ॥१॥
या विदर्भ प्रांति ऐकाना । जिल्हा बुलडाणा ॥
तहसिली त्या मलकापूर । गांव ते बिस्वा चांदूर ॥२॥
तये गावि पुण्य भूमित । क्षत्रिय कुलवंत ॥
तुकाराम भालेराव वसती । पत्नि त्यांची राधाबाइ ती ॥३॥
अठरासे नव्वदावे साली । श्रेष्ठ ह्या कुलीं ॥
जन्म जगदेवाचा झाला । जणूं संभाजिच अवतरला ॥४॥
थोर भाग्य तुकारामाचे । राधाबाईचे ॥
पोटि धर्मात्मा अवतरला । ध्वज कीर्तीचा फडकविला ॥५॥
पावित्र केले निजकुला । हिरा जन्मला ॥
प्रभा फाकली अंबरात । केला वंश विभूषीत ॥६॥
जसि वाढे चंद्राची कला । वाढुं लागला ॥
तेवि जगदेवहि दिस मास । झाली नऊ वर्ष त्यास ॥७॥
श्रीकृष्ण जेवि गोकुळी । गोपाळा मेळी ॥
खेळ खेळे चेंडू फळीचा । त्यास जो बहुत आवडीचा ॥८॥
तेवीच बाल मंडळी । जमवुनी खेळी ॥
खेळ जगदेवहि कुस्तीचा । त्यास जो बहुत आवडीचा ॥९॥
कुस्तिचा मर्दानी खेळ । खेळे बहु वेळ ॥
धडाधड चीत करी इतरा । म्हणति हा भीमच का दुसरा ॥१०॥
बारा वर्ष होता आयुला । जाउं लागला ॥
लाठि शिकण्यासी जगदेव । दिले आखाड्या मधि नांव ॥११॥

शाळेंतील मराठि शिक्षण । माध्यमिक घेऊन ॥
शाळेला ठोकला राम राम । संपला बाल वय क्रम ॥१२॥
संपले बालपण इथें । प्रौढ पणिचें ते ॥
कार्य वर्णिले पुढिल कवनी । शांत चित्ते ध्या ऐकुनी ॥१३॥
ज्याने जगति जन्मा येऊनि । धन्य केलि करणी ॥
पोवाडा त्या शुर मर्दाचा । ऐका शांत चित्त साचा ॥ धृ ॥

## [ चौक २ रा ]

ऐका हो सर्व सभाजन । पुर्व कालीन ॥
परिस्थिति चांदुर विसऱ्याची । शौचनियगति किति हिंदूंची ॥१॥
गाव बिस्वा रेल्वे स्टेशन । वस्ति तिथें जाण ॥
नउशे पन्नास घरे असती । तिन हजार तिथली शिर गणती ॥२॥
तये गांवि हिंदु मुसलमान । गणति ऐकान ॥
मुसलमान एक हजार असती । दोनपट हिंदुंची गणती ॥३॥
यवनांचे होते संघटन । विस्कळित जाण ॥ .
हिंदु तेथले तये वेळी । जाती जातित ती दुफळी ॥४॥
त्या स्थितिचा फायदा घेऊन । गुंड मुसलमान ॥
हिंदुवरि अत्याचार करती । मोगल शाही गाजविती ॥५॥
हिंदुचे देव देवळे ॥ फोडुनि ते वेळे ॥
हिंदुच्या भजनावरि हल्ला । करित ते बोलुनिया धुल्ला ॥६॥
हिंदुंचि मने दुखवाया । गायि कापाया ॥
नेति तिसबर्च्या खुपसुन । मिरवती भर वस्ती मधुन ॥७॥
हिंदुंचा माल शेतावरी । बांधुनी जबरी ॥
मालका धमकावुनि बोले । उठाके दे जल्दी साले ॥८॥

हिंदुच्या कुलिन स्त्रियावर । पोरे छीच्चोर ॥
खडे मारुनि लाविति नयन । उचलुनि नेती जबरीन ॥९॥
चालला नित्य व्यवहार । अनैतिक फार ॥
हिंदु जन त्राहि त्राहि बनले । यावनी त्रासामुळं असले ॥१०॥
एके दिवसि यवने मात केली । हिंदु स्त्री नेली ॥
एक जबरीनें उचलून । रडे अबला ती मोठ्यान ॥११॥
जगदेवराव ते वेळे । स्टेशनाकडे ॥
चालले होते मार्गानं । स्वर ऐकू आला करुण ॥१२॥
एका हिंदु गरिबस्त्रीवर । म्लेंछ बलात्कार ॥
करीता जगदेवा दिसलें । रक्त अंगातिल सळसळलें ॥१३॥
जगदेव अनिति दुस्मान । सतींचा प्राण ॥
गेला धावत मारुनि दौड । बडविले सोट्यांनीं गुंड ॥१४॥
गेले पळुनि नराधम दुरी । बाईला घरी ॥
आणले वीर जगदेवानं । वदे हिंदुंना त्वेषानं ॥१५॥
नेली समक्ष ओढुनी सती । याचि तुह्मां खंति ॥
वाटली नच नामर्दानो । भागुबाई बनला हिंदुनो ॥१६॥
कंकणे भरुनिया करी । बसारे घरी ॥
नेति तुमच्या भगिनी यवन । मिशा काय ओठावरि असुन ॥१७॥
हिंदूच्या जन्मुनी कुला । बट्टा लाविला ॥
धवल किर्तिला पुर्वजांचे । कुली जन्मुन काय कामाचे ॥१८॥
परधर्मि तुमचि इज्जत । डोळ्या देखत ॥
घेति तरि बघता नेत्र मिटुनी । लज्जा टाकलि का विकुनी ॥१९॥

पुर्वजांचा वाचा इतिहास । वदे हिंदूस ॥
बघा वडिलांनि काय केले । इज्जतिसाठि प्राण दिधले ॥२०॥
प्राचीन दिव्य सति सिता । रावणे नेता ॥
करुनि प्रतिकार जटायूनं । जिवाचे दिधले बलिदान ॥२१॥
दुर्जनें अरुंधति सति । नेतां सोडण्याती ॥
प्राण तानाजीनें दिधला । स्वाभिमान किति होता त्याला ॥२२॥
किति संभाजिचा अभिमान । जाज्वल्य जाण ॥
धर्मावरि श्रद्धा किती त्याची । केलि नाहि पर्वा प्राणाची ॥२३॥
इज्जतीसाठि दिले प्राण । पुर्वजे जाण ॥
षंढ तुह्मि त्या उदरीं आलें । का नच बाळपणी मेले ॥२४॥
शिवबाचे जमुन मावळे । यावनी चाळे ॥
बंद केले संघटना करुन । बोध घ्या इतिहासा मधुन ॥२५॥
झोंबले हृदयि वाक्बाण । हिंदूंच्या जाण ॥
हिंदु मग संघटीत बनले । यवन प्रतिकारासी सजले ॥२६॥
स्थापून मराठा मंडळ । केलि चळवळ ॥
दिले शिक्षण आखाड्याचे । खेळ शिकवीले कुस्तीचे ॥२७॥
लाठि शिकुन केले तय्यार । मराठा वीर ॥
प्रसंग पडतांच धावुन येती । प्रतीकार यवनांचा करती ॥२८॥
चोऱ्या करणें झाले मग बंद । स्त्रियांचा छंद ॥
सोडणें भाग मुसलमाना । खुपले जगदेव त्यांचे मना ॥२९॥
यवनांनीं विचार मग केला । बसुनि मशिदिला ॥
जग्या क फिर दुस्मन अपना । मगरुरी करता है अपना ॥३०॥

हिंदुकूं किया हुश्शार । बने शिरजोर ॥
नहीं कुच चलता अबि अपना । पिरो सालेकू काटोना ॥३१॥
करुनिया अशा वल्गना । मारण्या जाणा ॥
टपुनि या बसले मुसलमान । वाट संधीची पाहून ॥३२॥
जगदेवा नाद भजनाचा । होता हो साचा ॥
होत भजनामधि तल्लीन । करुन देवाचे चिंतन ॥३३॥
जमवूनि भजनि मंडळी ।मारुति देउळि ॥
थाट उडवीती भजनाचा । गजर करुनी इश नामाचा ॥ ॥३४॥
दर दशमि दिवसि शरगत । चांदुर विसव्यांत ॥
पुर्वि काढित हिंदु जनता । बंद केलि यवनांनी छळिता ॥३५॥
शरगस्त मिरवणूकीचा । रिवाज पूर्विचा ॥
चालु केला जगदेवान । खुपला यवना मनि म्हणुन ॥३६॥
एके दिवसि जमवुन मंडळी । भजन देऊळी ॥
संत जगदेव करित बसले । काय त्या समयासी घडले ॥३७॥
पुंडलीक् वरदे विठ्ठल । गर्जना बोल ॥
ऐकुनी यवन मनी चिडले । मंदिरा मधि धावुन आले ॥३८॥
तुकयाचे किर्तनी जसे । वेढले असे ॥
मुसलमानांनि शिवाजीस । तीच गति अजि जगदेवास ॥३९॥
दिलि धमकि भजनि मंडळिला मत् करो कल्ला ॥
भजन तुम बंद करो म्हणती । दहशत देउनि हिंदु प्रती ॥४०॥
नाहि घातली भीक धमकिला । इषारा दिला ॥
भजनि मंडळीस रावानं । भजनं चालू द्या जोरानं ॥४१॥

ऐकून वाणि वीराची । गेलि यवनांची ॥
आग पायाचि मस्तकाला । चढविला भजनावरि हल्ला ॥४२॥
पुंडलीक वरदे हरी । ठोकुन ललकारी ॥
मस्ति गुंडांचि जिरवण्याला। करायां प्रतिकारा सजला ॥४३॥
झाले सज्ज भजनिही सगळे । ठेचण्या चाळे ॥
गुंड यवनांचे टाळानं । घाबरुन गेले मग यवन ॥४४॥
यवनांचा उतरला धुल्ला । म्हणति या अल्ला ॥
मागे पाहती पुढें पळती । धडाधड ठेचाळून पडती ॥४५॥
आले श्वानापरी लहाकत । गुंड मशिदीत ॥
शांत मग तिथें मनी झाले । बडा जंजाल जग्या वदले ॥४६॥
ज्यानें जगति जन्मा येऊनी । धन्य केलि करणी ॥
पोवाडा त्या शुर मर्दाचा ऐका शांत चित्त साचा ॥४७॥

## चौक ३ रा

१९२८ सन । तीथी ऐकानं ॥
व्दीतीया वैशाख महिन्याची । पालखी निघलि शिवाजीची ॥१॥
शेंकडो हिंदु ते जन । दिंड्या घेउन ॥
पालखी मिरवति गांवांत । दिली जगदेवे हिंमत ॥२॥
वाजंत्रि वाजती पुढें । सनया चौघडे ॥
मृदंग टाळांचा झनकार । करिति इश नामाचा गजर ॥३॥
आलि गस्त मशिदी पुढं । यावनी गुंड ॥
बाजा मत बजाव यहां म्हणती । तुम्हारा हक्क नही वदती ॥४॥
जगदेव म्हणति यवनांस । हिंदुस्थानास ॥
इसवि सन दशवे शतकाला । मुसलमान नव्हता औषधाला ॥५॥

त्या समई तुमची मैजत । नव्हतिरे इथं ॥
हिंदुचं देवालय होतं । भजन इथें चाले दिन रात ॥६॥
हिंदुचा हक्क हिरावुन । जबर दस्तिन ॥
तुम्हीं घेतला साक्ष यांस । बघा मागिल तो इतिहास ॥७॥
पुर्वीचा आमुचा हक्क । बजावतो चोख ॥
नसे अन्याय यांत कांहीं । गाजविता तुम्ही मोंगलशाही ॥८॥
ते असो परि ह्या गांवांत । न्यावि शरगस्त ॥
वाजवित रित चालत आली । आज पावेतो मशिदि स्थली ॥९॥
सरकारि रस्त्यावरि जाण । हिंदु मुसलमान ॥
सर्वा मोकळीक वाजवण्याची । बंद पाडणें अन्याय हाची ॥१०॥
होत असेल नमाजी भंग । तरी व्हा दंग ॥
योग्यासम अमुच्या गिरि कुहरी । मशिद बांधुनि नगरा दूरी ॥११॥
नहि करोगे बाजा तुम बंद । ह्मणति आविंध ॥
तुमकु काटेंगे धमकि दिधली । पालखी त्यांनी आडविली ॥१२॥
नाहि घातलि भीक धमकिला । इषारा दिला ॥
हिंदुला विर जगदेवान । वाजवा बाजे जोरान ॥१३॥
ऐकून वाणि वीराचि । गेलि यवनांची ॥
आग पदतलिचि मस्तकाला । चढविला पालखिवरि हल्ला ॥१४॥
करुनिया सिंह गर्जना । विरानें जाणा ॥
घातली झडप तयावरती । जिरवण्या यवनांची मस्ती ॥१५॥
धावले हिंदूही सर्व । केला प्रतिकार ॥
धुव्वा यवनांचा उडवीला । हल्ला धैर्यानें परतविला ॥१६॥

दाणोदाण झाले मुसलमान । तोबा तोबा करुन ॥
धावता भुमि झाली थोडी । उडाली ती घाबरगुंडी ॥१७॥
यवनांनीं दावा केला पेश । सुटले निर्दोष ॥
रात्र जगदेव तये काली । शिक्षा यवनांना सुनावीली ॥१८॥
पालखी गेलि मिरवत । वाजत गाजत ॥
मुसलमान मनांत जळफळले। बडा जंजाल जग्या वदले ॥१९॥
धाके पडले कंसासम मनी । शयनि भोजनी ॥
कृष्ण जगदेव दिसे नयनी । दचकुन उठती झोपेतुनी ॥२०॥
जगदेव जळे अंतरी । करावे काय तरीं ॥
मुसलमान विवंचनेत पडले । पुन्हा कारस्थाना रचिले ॥२१॥
गाठके उसिकुं एकला । करोजी हल्ला ॥
विचार मग यवनांनी केला । जगूका करोजि बिसमिल्ला ॥२२॥
यापरी करुनिया विचार । यवन आसूर ॥
योग्य संधीस बघत बसले । मारण्या जगदेवा सजले ॥२३॥
तिथि गणेश चतुर्थी दिनी । संधि साधुनी ॥
मैजतित बसले मुसलमान । तयारी जय्यत तीं करुन ॥२४॥
जगदेवराव एकटे। स्टेशनाकडे ॥
चालले मैजतिच्या पुढुनी । झळकले यवनांचे नयनी ॥२५॥
धावले तयावरि गुंड । यावया तोंड ॥
वीर जगदेवहि तो सजला । करी घेऊन खडगा अपुला ॥२६॥
लागली उभयता झुंज । दाविले तेज ॥
क्षात्र कुल वीर मराठ्यांचे । वीर जगदेवाने साचे ॥२७॥

शत्रूस दाविना पाठ । प्राणाची गाठ ॥
झालि तरि खरा मर्द जाणा । मरे परि हटेन हा बाणा ॥२८॥
उतरला कसीं त्या वीर । यवन चौफेर ॥
मुखानें बोलुनिया धुल्ला । प्राणघातक केला हल्ला ॥२९॥
आयुष्य होते परि कांहीं । आले लवलाही ॥
धावुनी जिवलग गडि त्यांचे । प्राण वाचवण्या विराचे ॥३०॥
मित्रांनि प्रतिकार केला । हल्ला परत्वीला ॥
प्राण वाचविला हो मर्दाचा । उडविला धुव्वा यवनांचा ॥३१॥
ज्यानें जगतीं जन्मा येऊनीं । धन्य केली करणी ॥
पोवाडा त्या शुर मर्दाचा । ऐका शांत चित्त साचा ॥धृ॥

## [ चौक ४ था. ]

१९३२ सावे साली । लढाई जुंपली ॥
इंग्रज आणि हिंदवासि यांची । सिमा केली अन्यायाची ॥१॥
निशस्त्र करून प्रतिकार । इंग्रजा जेर ॥
कायदे भंग करुनि केले । शत्रुच्या नाकी नव आले ॥२॥
झाले क्रुद्ध इंग्रज सरकार । सत्याग्रहि वीर ॥
डांबले तुरुंगात धरुनी । मार तो दिधला लाठ्यांनीं ॥३॥
दिले निकस धान्य खावया । गिट्टी फोडाया ॥
लावले दळण दळायाला । लावले सक्त मजूरीला ॥४॥
कइकास दंड ठोकले । जप्ती लाविलें ॥
कुणाचे गृह दार शेत । छळ तो केला अन्वीत ॥५॥

त्या कायदेभंग संग्रामांत जनुने गांवांत ॥
दोनशावरी कैद केले । पुढारी चिंतेमध्यें पडले ॥६॥
वीरांचि पडलिसे वाण । सेनानी कोण ॥
करावा हाचि प्रश्न पडला । त्या समयासि पुढाऱ्याला ॥७॥
पुढाऱ्यांनि केला विचार। चांदुरावर ॥
गेले रावांच्या भेटीला । सांगती काय पुढें त्याला ॥८॥
जनुन्याचे समर भूंवरी । फुंकल्या भेरि ॥
सत्याग्रह युद्ध सुरू केले । आजपावेतो चालविले ॥९॥
शुर सैन्य दोनशांवरी सात अधिकारी ॥
इंग्रजे बंदिवासि केले । कडक शासनांस त्यां दिधले ॥१०॥
वीरांचि पडलिसे वाण । सेनानी जाण ॥
धजेना कोणि अतां पुढतीं । झालि ती अमुचि असाह्य स्थिती ॥१
युद्धाचे तुम्हां आमंत्रण । द्यावया जाण ॥
आलो आम्हि तुमचे गांवाला। विचार काय कळवा आम्हांला ॥१
केला हंसत मुख हो स्वीकार । दिला होकार ॥
वचन जगदेवांनी दिधले । पुढारी आनंदित झाले ॥१३॥
जगदेवां कुटुंब संभार । मोठा परिवार ॥
घरामधि कर्ते कुणी नव्हते । कठीण परिस्थिति त्या समयांतें ॥१४
त्या समई कच्चा कुणि जरी । असतां हो तरी ।
बळी तो कुटुंब मोहाला । असतांच खास पडला ॥१५॥
सोडून पत्नि मुलि मुलां । तेवि आईला ॥
जाऊं कैचा सत्याग्रहाला । विचार हा असतां मनीं आला ॥१६

जो खास सिंहाचा छावा । मोह त्या ठावा ॥
नसे तो कर्तव्या पुढतीं । विराची परिक्षाच होतीं ॥१७॥
शिवबांचं आलं सांगणं । तानाजिस जाण ॥
स्वारिं कर कोंडाण्यावरती । सुर्योदयि गड मिळवि हाती ॥१८॥
रायबाचा लग्न सोहळा । सोडुनि तै वेळा ॥
तानांजी सिंहगडी पडला । त्यागूनी कुटुंब मोहाला ॥१९॥
जगदेव शुराचा बच्चा । होता तो सच्चा ॥
तोडूनी प्रेम बंधनाला । रणीं जावया सज्ज झाला ॥२०॥
पुढाऱ्यांनि काढले उग्दार । धन्य हा वीर ॥
मराठा कुलांत अवतरला । क्षात्रकुल कर्तव्या सजला ॥२१॥
येऊन पुढाऱ्या समवेत । खामगावांत ॥
सभेमधि दिधले व्याख्यान । काय सांगे तो ऐकानं ॥२२॥
आज वर्ष दीडसें झाली । दास्य शृंखली ॥
अडकली माय भुमी अपुली । खितपत पर सत्तेखाली ॥२३॥
कावे बाज इंग्रज सरकार । लुटीले सर्व ॥
देश कफ्फलक बनवीला । मोताद अन्नाला केला ॥२४॥
परि अजुनि स्वस्थ तुम्हीं असे । बैसला कसे ॥
लाज तुम्हा नसेच का याची । गुलामी करीतां परक्यांची ॥२५॥
परक्यांच्या खाउनिया लाथा । जिवन कंठिता ॥
पुत्र म्हणविता मराठ्यांचे नांव गमविले पुर्वजांचे ॥२६॥
आंठवा पुर्व इतिहास । बघा शिवबास ॥
तानाजी काय करुन मेला । राणा प्रतापही तसला ॥२७॥

पारतंत्र्य घालवण्या दुरी । समर भूवरी ॥
पुर्वज रक्तांच्या त्या सरिता । वाहिल्या घोरत तुम्हीं पडता ॥२८
वडिलांचे धवल किर्तिला । बट्टा लाविला ॥
बुर्खा घेतला बेशरमेचा । खुन केला तो इज्जतीचा ॥२९॥
राखणें कुलाचे नांव । तरी घ्या धाव ॥
हाति खजीर अहिंसेचा । लढा लढवा स्वातंत्र्याचा ॥३०॥
झोंबले ऱ्हुदयी वाग्बाण । ऐकुन व्याख्यान ॥
शेंकडो वीर सज्ज झाले । समर जुन्याचे सुरु केले ॥३१॥
अहिंसा शस्त्र तें जहाल । सत्य ही ढाल ॥
करी घेऊन शौर्य दावा । सत्त्याग्रहि विजया मिळवा ॥३२॥
कॉंग्रेसचा घेऊनि अधिकार । आठवे डिक्टेटर ॥
बुलडाणा जिल्ह्याचे बनले । समर धडाक्यानें चालविले ॥३३॥
जगदेव शूर सेनापती । हुकुम सोडती ॥
सत्त्याग्रहि शुर विर दळभार । जावे चालुनि बेंदिवर ॥३४॥
तोडून बोरि बाभुळा । कायदेभग केला ॥
शौर्य दाविले इंग्रजास । पदीं तुडवुनी कायद्यास ॥३५॥
एक्से सात कलम लावुनी । नेले पकडुनी ॥
शिक्षा दिलि सक्त मजूरीची । विराला साहा महिन्याची ॥३६॥
आनंदे शिक्षा भोगुनी । राखली बाणी ॥
बुलडाणा युद्ध मंडळाची । सेवा केली राष्ट्राची ॥३७॥
भोगून शिक्षा राव येता । केलें स्वागता ॥
देशभक्त ही पदवि दिधली । योग्यता राष्ट्र कार्यि चढली ॥३८॥

# [ चौक ५ था. ]

जगदेवराव कार्याचा । आढावा वाचा ।
ऐका त्यांनि काय काय केले । अल्पचि पुढती सांगितले ॥१॥
मागें हो वर्णिल्या परी । त्रिस्त्रा चांदुरी ॥
मुसलमान हिंदु जनांवरती । अत्याचार नितचि करती ॥२॥
हिंदुंचे व्हावे रक्षण । म्हणूनी जाण ।
हिंदु संघटीत बनविले । कार्य त्यांनीं पहिले केले ॥३॥
यवनांचा करण्या प्रतिकार । हिंदु तय्यार ॥
केले विर जगदेवरावांनी । तयांना हिंमत देऊनी ॥४॥
आखाडा गावि स्थापुन । दिले शिक्षण ॥
हिंदु विरांना लाठीचे । खेळ शिकवीले कुस्तीचे ॥५॥
पोवाडे रचुन विरांचे । शूर मराठ्यांचे ॥
गाउनी हिंदुपुढें जाण । मर्द बनवीले हिंदु जन ॥६॥
गांवांत करुनि व्याख्यानं । धर्म अभिमान ॥
हिंदु मध्यें जागृत हो केला । त्यामुळे यवनां मनि खुपला ॥७॥
यवनांचे तावडीतुन । केले रक्षण ॥
हिंदु अबलांचे रावानं । सती धर्माचे पालन ॥८॥
यापरी मराठा कुळाचे । ब्रीद तें साचे ॥
राखलें विर जगदेवानं । केले धर्माचे पालन ॥९॥
गांवांत उघडि दवाखाना । मोफतचि जाणा ॥
औषधीं वाटे रोग्यास । स्वार्थाचा नाहीं लवलेश ॥१०॥

सोडून काम धंद्यास । रोगि पाहण्यास ॥
जाइ यवनांच्या ही घरि तो मनामध्यें आत्म भाव वसतो ॥११॥
ज्ञानाचा केला प्रसार । मोफतचि बार ॥
वाचनालय थापुन गांवी । कवडिही नच लागे द्यावी ॥१२॥
गरिबांचे मुला आणि मुली । विद्या शिकवली ॥
फुकटची विर जगदेवानं । गावि बोर्डींगा स्थापून ॥१३॥
कष्टानि देह झिजविला । परोपकार केला ॥
स्वार्थ मनि नच शिवला तिळही । गरीबी घरची असुनी ही ॥१४॥
या परी चांदुर बिसव्याचे । कार्य केले साचे ॥
राष्ट्र कार्यार्थ ही तो झटला । देतो आढावा तुम्हांला ॥१५॥
कॉंग्रेसचा करुन स्वीकार । करी तो पुकार ॥
यारे भू मुक्त करुं अपुली । त्री रंगी झेंड्याखाली ॥१६॥
शेंकडों देऊन व्याख्यानं । खेड्या पाड्यानं ॥
राजकारणा विशद केले । सभासद कॉंग्रेस वाढवले ॥१७॥
कॉंग्रेसच्या आज्ञेनूसार । त्यांनि बहिस्कार ॥
पुकारुन परदेशी वरती । प्रचार स्वदेशीचा करती ॥१८॥
१९३२ साचे साला । सत्याग्रह झाला ॥
भाग घेतला तये समरी । शिक्षा भोगली सक्त मजुरी ॥१९॥
ठिक ठिकाणी ग्रामसुधारणा । मंडळे जाणा ॥
उभारुनि ग्राम सुधारणेस । दिले उत्तेजन जनतेस ॥२०॥
स्थापली परीषद बार । शेतकरी मजुर ॥
जागृती तया मध्यें केली । जाणिव अन्याय त्या दिधली ॥२१॥

काढून राष्ट्रसेवक । पत्र पाक्षिक ॥
अज्ञ शेतकऱ्या मार्ग दावी । अमोल सेवा किति वर्णावीं ॥२२॥
सामाजीक सुधारणेवरी । किर्तनें करी ॥
बंड मोडण्या अंध रुढिचे । कार्य केले बहु मोलाचे ॥२३॥
खेडोपाडि दौरे काढुन । दिली व्याख्यानं ॥
जागृती केली जनतेत । सोसुनी कष्टां दौऱ्यांत ॥२४॥
समाचार पत्र अकोल्याचे । कार्य तें त्याचें ॥
केले बिन वेतन घेऊन । लाविला स्वार्थ पिटाळून ॥२५॥
त्या परिच मलकापुरी । काम तो करी ॥
शिवाजी फ्री बोर्डिंगाचे । वेतन नाहीं कवडीचें ॥२६॥
ऐका त्यांचि वाग्मय हो सेवा । अमोलिक ठेवा ॥
गेले ग्रंथांचा ठेवून । प्रकाशित नच परि ते अजुन ॥२७॥
गोऱ्यांचे बंड नाटक । भारत आधुनिक ॥
भारत पुत्र जहरि प्याला । नाटकांची पुस्तकमाला ॥२८॥
तानाजीचा रचला पोवाडा । वसईचा वेढा ॥
पोवाडा चालु जमान्याचा । तसा शेतकरी दुर्दशेचा ॥२९॥
तानाजीच्या पोवाड्यावर । खूष पुणेकर ॥
होउनी परितोषक दिधले । रुपये सव्वासे अर्पियले ॥३०॥
तुकाराम अभंगाची टिका । आत्म बोध ऐका ॥
तसी जगदेवहि भजनावली । नेवि चैतन्य ति पद्यावली ॥३१॥
या परी ग्रंथ अमोलिक । किरकोळ अनेक ॥
नाही घेतले यांत गणती । संग्रह कवितांचाही तो अती ॥३२॥

वक्तृत्व त्यांचे हो फार । असे जोरदार ॥
होते लेखक ते आणि कवि । अमोल सेवा किति वर्णावी ॥३३॥
हरदासि किर्तनहि बार । करति छानदार ॥
गीतेतिल तत्व बोध करिती । गीता सर्वहि पाठांतर ती ॥३४॥
ज्वालापुरचे गीता समेलनी । दाविली म्हणुनी ॥
गीता बेचाळिस मिनिटांत । नंबर पहिला केला हात ॥३५॥
ज्वालापुरी होउनि सन्मान । केलि अर्पण ॥
गीता चांदीच्या करंडाची । नौबत झडली कीर्तीची ॥३६॥
सेवा हि अमोलिक बघुनी । अनेक संस्थांनी ॥
जबाबदारीचे अधिकार । वाहिले त्यांचे अंगावर ॥३७॥
तालुका कॉंग्रेस कमेटिचे । आणि बोर्डाचे ॥
चेअरमन पदीं विराजमान । त्यांनाची केले जनतेनं ॥३८॥
सभासदहि होते प्रांतिकचे । कॉंग्रेस कमेटिचे ॥
मराठा मजुर परिषदेचे । त्याजकडे पद अध्यक्षांचे ॥३ ॥
आजन्म परोपकार केला । म्हणुनि वर आला ॥
श्रेष्टपदिं चढला गरिबितुन । झाले नच कइकांना सहन ॥४०॥
कर्तव्यें दीप चमकला । प्रकाश पसरला ॥
परी विझवला हो दुष्टांनी । कथा येईल पुढच्या कवनीं ॥४१॥
ज्याने जगति जन्मा येऊनी । धन्य केलि करणी ॥
पोवाडा त्या शुर मर्दाचा । ऐका शांत चित्त साचा ॥धृ॥

## भाग १ ला समाप्त.

मुद्रकः—श्री शिवाजी प्रेस, खामगांव.